नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०७/२०२६ (रविवार)**

## नागपूर शहर हद्दीतून अपहरण केलेल्या लहान मुलीला पाचगाव पोलिसांच्या सतर्कतेमुळे आरोपी पकडला गेला व पाचगाव पोलीसांनी आरोपी व मुलीला केले नागपूर शहरातील वाठोडा पोलीसांच्या स्वाधीन

मा. श्री हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के अप्पर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री मयंक माधव, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री रवींद्र मानकर प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन पाचगाव यांच्या नेतृत्वात पाचगाव पोलिस यांनी सतर्कता, तत्परतेने मिळालेल्या माहितीची गंभीरतेने दखल घेत अल्पवयीन मुलीच्या अपहरणाचा गुन्हा त्वरित उघडकीस आणला.

दिनांक ११/०७/२०२६ रोजी रात्री ८.४५ वाजताच्या सुमारास पाचगाव पोलीस स्टेशन हद्दीतील चांपा गाव येथे मुकेश पहेलसिंग मडावी, वय २३ वर्षे, रा. डोंगरिया, ता. व जि. मंडला, मध्यप्रदेश हा अंदाजे ३ वर्षांच्या अल्पवयीन मुलीसह निलेश नगराळे यांच्या घरी जाऊन मुलीसाठी जेवणाची मागणी करत असून सदर व्यक्ती मद्यधुंद अवस्थेत असल्याची माहिती पाचगाव पोलिसांना प्राप्त झाली. अशी माहिती पाचगाव पोलिसांना प्राप्त होताच तात्काळ नमूद इसमास ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता त्याने संबंधित अल्पवयीन मुलीला नागपूर शहरातील खरबी चौक परिसरातून अपहरण करून आणल्याचे सांगितले.

याबाबत पाचगाव पोलिसांनी तात्काळ पोलीस स्टेशन वाठोडा, नागपूर शहर यांच्याशी संपर्क साधून माहितीची पडताळणी केली असता संबंधित अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची माहिती प्राप्त झाली. यानंतर पाचगाव पोलिसांनी कोणताही विलंब न करता आरोपी मुकेश पहेलसिंग मडावी व अल्पवयीन मुलीला पोलीस स्टेशन वाठोडा येथे सुरक्षितरित्या रवाना केले. या प्रकरणी पोलीस स्टेशन वाठोडा येथे आरोपीविरुद्ध अपहरण आणि पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

**नागपूर ग्रामीण जिल्ह्यात नव्याने स्थापन झालेले पोलीस स्टेशन पाचगाव दिनांक २०/०३/२०२६ रोजी कार्यान्वित झाले. अवघ्या काही महिन्यात पाचगाव पोलिसांनी तत्परता, कर्तव्यदक्षता आणि प्रभावी समन्वयाचे दर्शन घडवत अपहरणकर्त्याच्या तावडीतून तीन वर्षीय बालिकेची सुखरूप सुटका केली असुन नागपूर ग्रामीण भागात वाढत्या पोलीस स्टेशनमुळे प्रभावी तसेच उल्लेखनीय कामगिरी करण्यात आली आहे.**

## मोटरसायकल चोरीचा गुन्हा उघड, ३ आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ११/०७/२०२६ रोजी फिर्यादी राजेश नामदेवराव मारबते, वय ४५ वर्ष, रा. राउत ले आउट, वार्ड क्र ०९, पांढुर्णा रोड सावनेर, ता. सावनेर, जि. नागपुर यांनी पोलीस स्टेशन सावनेर येथे तक्रार दिली की, दिनांक १०/०७/२०२६ रोजी १०.३० वा. ते १६.०० वा. दरम्यान डॉ. लाकडे दवाखान्याचे समोर सावनेर येथुन फिर्यादीची हिरो स्मार्ट मोटर सायकल क्र. एम एच—४०/ए डब्लु ३७६८ कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली. फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे अप. क्र. ६९५/२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ११/०७/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभागात उघड न झालेल्या गुन्हयांचा तपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून पोलीस ठाणे सावनेर येथील अप. क्र. ६९५/२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. चे गुन्ह्यातील **आरोपी नामे १) सुरज नट्टूजी धनगरे, वय ४० वर्ष, रा. दर्शन कॉलनी नंदनवन, नागपूर** हा असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. आरोपीचा शोध घेऊन त्यास दर्शन कॉलनी नंदनवन नागपूर येथुन ताब्यात घेतले. आरोपी कडे कौशल्यपुर्ण तपास करीत गुन्ह्यासंबंधाने सखोल विचारपूस केली असता त्याने त्याचे आणखी ०२ साथीदारांसह पोलीस स्टेशन सावनेर परिसरातून मोटरसायकल चोरी केल्याचे कबुल केले. दोन्ही आरोपी २) अंगद वामनराव काकडे, वय ३८ वर्ष, रा. गरोबा मैदान टेलिकॉम एक्सचेंज चौक नागपूर ३) प्रमोद गुलाबराव येडमे, वय ३९ वर्ष, रा. श्रीकृष्ण नगर, नंदनवन नागपूर यांना पोलीसांनी ताब्यात घेतले. पोलीसांनी पंचासमक्ष गुन्हयातील १) गुन्हयात चोरीस गेलेली हिरो स्मार्ट मोटर सायकल क्र. एम एच—४० ए डब्लु ३७६८ किंमती २५,०००/—रूपये २) गुन्हयात वापरलेली होंडा शाईन मोटरसायकल किंमती ७०,०००/—रूपये असा एकूण ९५,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. **आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**




## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०२ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक ११/०७/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत आरोपी विजय उर्फ अभिजीत युवराज कठाणे, वय २४ वर्ष, रा. इंदिरानगर नरखेड, जिल्हा नागपूर हा नगरपरिषदच्या मागे नरखेड येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन रामटेक** अंतर्गत आरोपी सय्यद हुसेन सयद सलीम, वय २९ वर्ष, रा. मोहनलाल वाजपई नगर, कळमना नागपुर हा शितलवाडी रामटेक येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १२ गुन्हे नोंद

दिनांक ११/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल सडवा, देशी दारू असा एकुण २,७७,८२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १५६६० मिली देशी दारू, ५४ लिटर मोहाफुल दारू, ६७०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, साहित्य असा एकुण २,७७,८२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने